**ठळक बातम्या**

- स्कायरूट या भारतीय अंतराळ स्टार्टअपच्या इन्फिनिटी कॅम्पसचं प्रधानमंत्र्यांकडून दूरस्थ पद्धतीने उद्घाटन

- युनेस्कोच्या मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण

- सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ६ पूर्णांक ६ दशांश टक्क्यानी वाढण्याचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज

**आणि**

- श्रीलंकेच्या बदुल्ला जिल्ह्यात दरडी कोसळल्यामुळे ११ जणांचा मृत्यू, तर ७ जण बेपत्ता

**<><><><><>**

भारताच्या अंतराळ संशोधन क्षेत्रात सरकारने अनेक सुधारणा केल्या असून जगातले गुंतवणूदार याकडे आकर्षित होत आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. स्कायरूट या भारतीय अंतराळ स्टार्टअपच्या इन्फिनिटी कॅम्पसचं उद्घाटन आज प्रधानमंत्र्यांनी दूरस्थ पद्धतीने केलं, त्यावेळी ते बोलत होते. अंतराळ संशोधन क्षेत्र खासगी नवोन्मेषासाठी खुलं करण्यात आल्यामुळे स्टार्टअप आणि उद्योगांना देशाच्या वैज्ञानिक परिसंस्थेत काम करणं सुलभ झालं, येणाऱ्या काळात जागतिक अंतराळ क्षेत्र अर्थव्यवस्था झपाट्याने वाढणार असून देशातल्या युवावर्गाला रोजगाराच्या संधी कैकपटीने वाढणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

भारताच्या अंतराळ संशोधन क्षेत्राच्या भवितव्याला ३०० पेक्षा जास्त स्टार्टअप्स आकार देत आहेत, स्कायरूट इन्फिनीटी कॅम्पस हे देशाच्या नवा विचार, नवोन्मेष आणि युवा शक्तीचं प्रतीक आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड - बाईट -मोदी**

इस्रोने भारताच्या अंतराळ क्षेत्राला नव्या उंचीवर नेऊन ठेवलं असून विश्वासार्हता, क्षमता आणि मूल्यं यांच्या जोरावर भारतानं जागतिक अंतराळ संशोधन क्षेत्रात नवी ओळख निर्माण केली आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

पॅरिस इथल्या युनेस्कोच्या मुख्यालयात काल संविधान दिनानिमित्तानं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या त्यांच्या पोस्टमध्ये अभिमान व्यक्त केला आहे. भारतीय राज्यघटना तयार करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला दिलेली ही आदरांजली आहे, असं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आणि संकल्पनांनी अगणित लोकांच्या जीवनात शक्ती आणि आशा निर्माण केल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाची सैन्यदलं अतिशय देशभक्तीने तसंच कार्यक्षमतेने देशाच्या सार्वभौमत्वाचं रक्षण करण्यासाठी सज्ज असतात, अशा शब्दांत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सैन्यदलांची प्रशंसा केली आहे. नवी दिल्लीत आयोजित चाणक्य संरक्षण संवाद २०२५ मध्ये त्या आज बोलत होत्या. नुकत्याच झालेल्या ऑपरेशन सिंदूरच्या यशामध्ये देशाच्या दहशतवादविरोधी आणि प्रतिबंधात्मक क्षमतेचा परिचय मिळाला असून भारतीय सैन्यदलांनी ज्या कार्यक्षमतेनं आणि नैतिक जाणीव

ठेवून लष्करी क्षमता वापरली त्याची जगभरात नोंद घेतली गेली आहे, असं त्यांनी सांगितलं.

राष्ट्रपती आजपासून ओदिशाच्या दौऱ्यावर असून आज संध्याकाळी त्या ओदिशा विधानसभेच्या हिवाळी सत्राला संबोधित करतील. राष्ट्रपती पदभार स्वीकारल्यापासून प्रथमच ओदिशाच्या विधानसभेला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २९ नोव्हेंबर पासून छत्तीसगडच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असून ते पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या साठाव्या अखिल भारतीय परिषदेत सहभागी होतील. या परिषदेत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पोलिसांना राष्ट्रपती पदकांचं वितरण होणार आहे. या तीन दिवसांच्या परिषदेचा उद्देश पोलिसांसमोरच्या प्रमुख आव्हानांना सामोरं जाताना झालेल्या प्रगतीचा आढावा घेणं आणि विकसित भारतासाठी देशाची सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने भविष्यकालीन रुपरेषा आखणं हा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल हे देखील या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ६ पूर्णांक ६ दशांश टक्क्यानी वाढण्याचा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केला आहे. जीएसटी सुधारणांमुळे अमेरिकेने लादलेल्या आयात कराच्या प्रतिकूल परिणामापासून देशाची अर्थव्यवस्था वाचण्याची शक्यता आहे, असंही यात नमूद करण्यात आलं आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सकल राष्ट्रीय उत्पादन ७ पूर्णांक ८ दशांश टक्के इतकं होतं. तसंच मागील आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेची वाढ ६ पूर्णांक ५ दशांश टक्के नोंदवण्यात आली होती. या वर्षात त्यात वाढ होण्याचा अंदाज असल्यानं भारतीय अर्थव्यवस्था सातत्यानं वाढ करत असल्याचं नाणेनिधीनं म्हटलं आहे. व्यापक संरचनात्मक सुधारणा करून

भारताच्या अर्थव्यवस्थेत प्रगती साधली जाऊ शकते, असंही या अहवालात म्हटलं आहे.

<><><><>

केरळमध्ये मतदार याद्या पुनरावलोकनासाठी आतापर्यंत १ कोटी ३७ लाख ३६ हजार ७३७ अर्ज डिजीटल स्वरुपात प्राप्त झाले आहेत. केरळमध्ये आतापर्यंत ४९ टक्के अर्ज हे ऑनलाईन प्राप्त झाले असून उर्वरित अर्ज स्वीकारण्यासाठी आणि अपलोड करण्यासाठी विशेष शिबीरं भरवण्यात येणार असून त्या द्वारे अर्ज अपलोड केले जाणार आहेत.

<><><><>

श्रीलंकेच्या बदुल्ला जिल्ह्यात दरडी कोसळल्यामुळे आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला असून ७ जण बेपत्ता असल्याचं वृत्त आहे. बदुल्ला जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे सहा ठिकाणी दरडी कोसळल्या असून मदत आणि बचाव कार्य सुरु आहे. दरम्यान, श्रीलंकेच्या राष्ट्रीय बांधकाम संशोधन संस्थेने बदुल्ला, कॅण्डी, मटाले आणि नुवारा एलीया या जिल्ह्यांमधल्या दरड प्रवण जागा नागरिकांनी रिकाम्या कराव्यात, असा इशारा दिला आहे.

<><><><>

भारत आणि संयुक्त अरब अमिरातीच्या सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार- सीईपीए साठीच्या संयुक्त समितीची तिसरी बैठक काल  नवी दिल्लीत पार पडली. आर्थिक वर्ष २०२४-२५ दरम्यान दोन्ही देशांमधील व्यापार सुमारे साडेएकोणिस टक्क्यांनी वाढला असून त्याची किंमत १०० अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या वर गेल्याच्या आकडेवारीचं या बैठकीत स्वागत करण्यात आलं.

द्विपक्षीय व्यापारातल्या बाजार प्रवेश, माहिती हस्तांतरण, डम्पिंग विरोधी कृती आणि बी आय एस परवान्यांबद्दल या बैठकीत आढावा घेण्यात आला.

<><><><><>

अमेरिकेत पुढच्या वर्षी फ्लोरिडा येथे होणाऱ्या जी २० शिखर परिषदेला दक्षिण अफ्रिकेला निमंत्रित केलं जाणार नाही. दक्षिण अफ्रिका जी २० परिषदेच्या सदस्य होण्याच्या योग्यतेचा नाही, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात यंदा जून ते सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पुढच्या एक वर्षासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच सर्व बाधित तालुक्यांच्या सर्व गावातील बाधित शेतकऱ्यांच्या अल्पमुदत कर्जाचं मध्यम मुदत कर्जात रुपांतरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सहकार विभागाने यासंदर्भातील परिपत्रक जारी केलं आहे. राज्य सरकारने ऑक्टोबर महिन्यात ३२ हजार कोटींचा विशेष मदतनिधी जाहीर केला होता; त्याचवेळी दुष्काळी उपाययोजना, सवलती लागू करण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर कर्ज पुनर्गठन आणि वर्षभरासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली आहे. राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई त्याचप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. तसंच सहकार आयुक्तांनी परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल याची दक्षता घ्यावी, असंही परिपत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

<><><><><>

गोव्यात सुरू असलेल्या ५६व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आजही जगभरातले विविध चित्रपट दाखवले जात आहेत. 'ऑरेंडा', 'कॉटन क्वीन', 'अ पोएट', 'स्लीपलेस सिटी', 'द वुमन' या चित्रपटांचा यात समावेश आहे. विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये गाजलेला आणि इफ्फीमध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पणाच्या शर्यतीत असलेला 'फ्यूरी' हा चित्रपट आज दाखवण्यात आला. याशिवाय, अभिनेता आमिर खानचा मास्टरक्लास तसंच शोले चित्रपटाला ५० वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं रमेश सिप्पी आणि किरण सिप्पी यांचंही सत्र आज होणार आहे.

**<><><><><>**

पंजाबमध्ये आज शीत लहर येण्याचा तर हरियाणा, चंदिगढ, दिल्ली आणि हिमाचल प्रदेशात धुक्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. अंदमान निकोबार बेटांसह केरळ, माहे, तामिळनाडू, पुदुच्चेरी आणि करैकेल भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. दरम्यान, राजधानी दिल्ली भागातल्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक आज सकाळी ३४६ पर्यंत घसरला असून हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगानं तातडीच्या उपाययोजना लागू करण्याचे आदेश दिले आहेत.

**//<><><><><>//**